महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

कार्यकारी अभियंता, खारभुमी विकास विभाग

जुना मुंबई पुणे रोड दत्तवाडी, कळवा-ठाणे जि.ठाणे

दूरध्वनी : ०२२-२५४०१४७७ ई-मेल : *klddthane@gmail.com*


**"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा"**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

| | |
|---|---|
| जा.क्र.खाभूविवि/कळवा ठाणे/ लेशा-२/११९६/ सन-२०२२ | दिनांक:- २३/०८/२०२२ |

प्रति,
मा.अधिक्षक अभियंता
कोयना संकल्प चित्र मंडळ
पुणे.

विषय :- जाहिरात प्रसिध्द करणे बाबत.(कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता,सहा अभियंता श्रेणी-२) सेवा निवृत्त अधिकारी/ अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेण्याबाबतची जाहीरात प्रसिध्दी करण्यात बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागांतर्गत (कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, सहा अभियंता श्रेणी-२) सेवा निवृत्त अधिकारी/ अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेण्याबाबतची जाहीरात प्रसिध्दी दिनांक ०१/०९/२०२२ रोजी wrd.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्दी करण्यात यावी ही विनंती.

हे आपल्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(पं. चं. दाभिरे)
कार्यकारी अभियंता
खारभूमी विकास विभाग
कळवा, ठाणे.

D:\AB 2\Gen. Letter.Docx K

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन
# जलसंपदा विभाग,
## - जाहिरात –

**खारभूमी विकास मंडळांतर्गत कार्यालयाकरीता (कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंताश्रेणी-२ (स्थापत्य) सेवानिवृत्त अधिकारी/अभियंता यांच्या सेवा करारपध्दतीने विवक्षीत कामासाठी घेण्याबाबत.**

**संदर्भ :-**

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/ १३ दि.१७ डिसेंबर २०१६

२. प्रदेश कार्यालयाचे पत्र क्र.मुअ/जसंविकोप्र/आ-२/३२७६/२०२२ दि.१७.०८.२०२२

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे या कार्यालयामार्फत ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रकल्पाच्या कामाकरिता नामनिर्देशित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहा.अभि.श्रेणी-२(स्थापत्य) संवर्गातील पदे करार पध्दतीने भरावयाची आहेत. तरी पात्र सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहा.अभि.श्रेणी-२(स्थापत्य) यांचेकडून विहीत नमुन्यातील अर्ज खालील नमूद केलेल्या ठिकाणी व्यक्तीश: दिनांक ०२.०९.२०२२ ते ०९.०९.२०२२ पर्यंत उपलब्ध होतील.

ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/ सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विभागीय/उप विभागीय कार्यालयात खारभूमी प्रकल्पाकरीता बांधकामाची अंदाजपत्रके तयार करणे, सर्वेक्षण, निविदा, कागदपत्रे तयार करणे व प्रकल्प, क्षेत्रिय स्थळी कामावर देखरेख करणे असे कामाचे स्वरुप असेल.

खारभूमी योजनांच्या निर्मितीसाठी करारपध्दतीने एकत्रित सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांच्या सेवा विवक्षीत कामासाठी घेण्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे-.

| अ.क्र. | पदाचे नांव | ज्या विभागांतर्गत पदांची आवश्यकता आहे त्या विभागाचे नांव | करार पध्दतीने भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता/सहा. अभि. श्रेणी-२ (स्थापत्य) | १. कार्यकारी अभियंता, खारभूमी विकास विभाग, कळवा ठाणे. | १ |
| | | २. कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण-रायगड. | २ |
| | | ३. कार्यकारी अभियंता, द.र.खारभुमी विकास विभाग रत्नागिरी | १ |
| | | ४. कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, सिंधुदूर्गनगरी | २ |

**अ) पदासाठी अर्हता**

१. कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहा.अभि.श्रेणी-२ (स्थापत्य) संवर्गातील पदावर कमीत कमी २ वर्षांचा अनुभव आवश्यक.



Scanned with CamScanner

**ब) वयोमर्यादा :-**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहा.अभि.श्रेणी-२ (स्थापत्य) यांची कमाल वयोमर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसावी.

**क)** (१) अर्ज हे खालील नमुद कार्यालयात सुटटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत दिनांक ०२.०९.२०२२ ते ०९.०९.२०२२ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं.५.३० या वेळेत रु.१००/- इतक्या किंमतीस विक्रीसाठी उपलब्ध राहतील.

- कार्यकारी अभियंता, खारभूमी विकास विभाग ठाणे.जुना मुंबई- पुणे महामार्ग, दुरध्वनी कार्यालयासमोर कळवा-ठाणे,
  कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०२२-२५४०१४७७
- कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, उंबर्डे फाटा, गजानन महाराज मंदिराजवळ, रामवाडी पेण, जि. रायगड.
  कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०२१४३/ २५२२०३.
- कार्यकारी अभियंता, द.र. खारभूमी विकास विभाग, रत्नागिरी जि. रत्नागिरी.
  कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०२३५२-२२८४०५
- कार्यकारी अभियंता, सिंधुदुर्ग खारभूमी विकास विभाग, सिंधुदूर्गनगरी जि. सिंधुदूर्ग.
  कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०२३६२/ २२८८१८०

करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या अटी व शर्ती अजर् विकत घेताना पहावयास मिळतील. या अटींचे पालन करणे बंधनकारक असेल.

(२) सदर परिपूर्ण भरलेले अर्ज दि.२६.०९.२०२२ सायं.५.३० पर्यंत हस्तेपोहोच/टपालाने संबंधीत विभागात स्विकारले जातील. अर्जाच्या पाकीटावर सेवानिवृत्त अधिकारी/अभियंता यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत असे स्पष्ट लिहावे. उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा व अपूर्ण अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

(३) अपूर्ण भरलेले व चुकीची माहिती दिलेले अर्ज स्विकारण्याचा, नाकारण्याचा व पदामध्ये फेरबदल तसेच भरतीप्रक्रीया कोणत्याही कारणास्तव स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी या नात्याने खालील सही करणारे हे आपल्याकडे राखून ठेवत आहेत.

**स्थळ प्रत प्र.सं.व अ.अ.यांनी मान्य** केली आहे.

(म.प्र.मराठे )
सहाय्यक अधीक्षक अभियंता,
खारभूमी विकास मंडळ, ठाणे.



Scanned with CamScanner